(इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

[१९६१] २ एस. सी. आर. ३४३

मनोहर लाल

वि.

पंजाब राज्य

( जाफर इमाम, जे. एल. कपूर, के. सी. दास गुप्ता, रघुबर दयाळ आणि

एन. राजगोपाल अय्यंगार, न्या. न्या. )

व्यवसाय कर्मचारी - बंद दिवस - कायदा - मूलभूत अधिकारांचे उल्लंघन झाल्यास - कामगारांचे कल्याण - संरक्षण - निर्बंध - जर अवाजवी असेल तर - पंजाब ट्रेड एम्प्लॉईज अधिनियम, १९४०, (पंजाब सन १९४० चा क्र, १०) कलम ७ (१).

अपीलकर्ता, जो एक दुकानदार होता, त्याला पंजाब ट्रेड एम्प्लॉइज अधिनियम, १९४० च्या कलम ७ (१) मधील तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल अतिरिक्त जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी दुसऱ्यांदा दोषी ठरवले, ज्यानुसार त्याने स्वत: "बंद दिवस " म्हणून निवडलेल्या दिवशी आपले दुकान बंद ठेवणे आवश्यक होते. त्याने अशी विनंती केली की, हा अधिनियम त्याच्या दुकानाला लागू होत नव्हता, कारण त्याने कोणत्याही अनोळखी व्यक्तीला कामावर ठेवले नव्हते, तर त्यात त्याने स्वत: एकट्याने काम केले

आणि त्याच्या दुकानाला कलम ७ (१) लागू करणे हे अनुच्छेद १४, १९ (१) (च) आणि (छ) अन्वये त्याच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन ठरेल आणि लादलेले निर्बंध अनुच्छेद १९ (६) च्या अर्थानुसार वाजवी नव्हते कारण ते सर्वसामान्य जनतेच्या हिताचे नव्हते. उच्च न्यायालयाने दंडाधिकाऱ्यांच्या आदेशाचे पुनरीक्षण करण्याचा त्याचा अर्ज फेटाळून लावला. उच्च न्यायालयाच्या प्रमाणपत्रावरील अपिलावरुन.

असा निर्णय देण्यात आला की, अधिनियमाचा मुख्य उद्देश कर्मचाऱ्यांचे कल्याण आणि त्यांना जास्त काम करण्यापासून रोखून त्यांच्या आणि त्यांच्या नियोक्त्यांच्या आरोग्याचे रक्षण करणे हा होता. सर्वसामान्य जनतेच्या हिताचा असल्यामुळे असा निर्बंध राज्यघटनेच्या अनुच्छेद १९ (६) च्या अर्थानुसार वाजवी होता.

कलम ७ (१) च्या तरतुदी घटनात्मकरीत्या वैध होत्या आणि प्रशासकीय सोयी मिळविण्यासाठी आणि कामगारांच्या संरक्षणासाठी तयार केलेल्या तरतुदींचा गैरवापर टाळण्यासाठी समर्थनीय होत्या.

मनोहर लाल वि. राज्य [१९५१] एस. सी. आर. ६७१, संदर्भित.

फौजदारी अपीलिय अधिकारिता : फौजदारी अपील क्रमांक १७३/१९५६.

फौजदारी पुनरीक्षण क्रमांक १०५८/१९५४ मधील पंजाब उच्च न्यायालयाच्या दिनांक २३ मे, १९५६ रोजीच्या न्यायनिर्णय व आदेशावरून अपील.

के. एल. अरोरा, अपीलकर्त्यासाठी.

एन. एस. बिंद्रा आणि आर. एच. ढेबर, उत्तरवादीसाठी.

११ नोव्हेंबर, १९६०. न्यायालयाचा न्यायनिर्णय  अय्यंगार, न्या. यांनी दिला.

राज्यघटनेच्या अनुच्छेद १३२ आणि १३४ (१) अन्वये, पंजाब उच्च न्यायालयाने मंजूर केलेल्या प्रमाणपत्रावर केलेले हे अपील पंजाब ट्रेड एम्प्लॉईज अधिनियम, १९४० च्या कलम ७(१) ची  घटनात्मकता विचारार्थ उपस्थित करते.

अपीलकर्ता -  मनोहर लाल यांचे फिरोजपूर कॅनटोनमेंट  येथे दुकान असून त्यात 'इम्पीरियल बुक डेपो' या नावाने व शैलीत व्यवसाय चालतो. पंजाब ट्रेड एम्प्लॉईज अधिनियम, १९४० (यापुढे अधिनियम असे संबोधण्यात आले आहे)  च्या कलम ७ नुसार :

"७. (१) या अधिनियमाने अन्यथा तरतूद केल्याव्यतिरिक्त, प्रत्येक दुकान किंवा वाणिज्यिक आस्थापना बंदच्या दिवशी बंद राहतील.

(२) (i) बंदीचा दिवस हा दुकानाच्या  किंवा वाणिज्यिक आस्थापनेच्या ताबाधारकाच्या पसंतीनुसार असेल आणि हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या कालावधीत विहित प्राधिकाऱ्याला कळविण्यात येईल."

या अपीलाशी संबंधित तरतुदीचा उतारा. अपीलकर्त्याने शुक्रवार हा बंद दिवस, म्हणजेच आठवड्याच्या ज्या दिवशी त्याचे दुकान बंद राहील तो दिवस, म्हणून निवडला. निरीक्षक,  दुकाने आणि व्यावसायिक आस्थापने, फिरोजपूर मंडल यांनी शुक्रवार, दिनांक २९ जानेवारी, १९५४ रोजी अपीलकर्त्याच्या  दुकानास भेट दिली आणि त्यांना दुकान उघडे असल्याचे आणि अपीलकर्त्याचा मुलगा वस्तू विकत असल्याचे  आढळले.

अर्थातच, जर कलम ७ (१) वैध होते, तर त्यातील अटींच्या उल्लंघनाबद्दल अपीलकर्ता दोषी होता आणि त्यानुसार, अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, फिरोजपूर यांच्या न्यायालयात अधिनियमाच्या कलम १६ अन्वये गुन्हा केल्याबद्दल त्याच्याविरुद्ध खटला चालविण्यात आला आणि ते कलम पुढीलप्रमाणे आहे :-

"या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, जो कोणी या अधिनियमातील कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करेल, ............. तो दोषसिद्धीनंतर पहिल्या गुन्ह्याकरिता पंचवीस रुपयांपेक्षा पर्यंत कमी नाही इतक्या दंडास आणि त्यापुढील प्रत्येक गुन्ह्याकरिता शंभर रुपयांच्या दंडास पात्र असेल."

अपीलकर्त्याने वस्तुस्थिती मान्य केली, परंतु त्याने असा युक्तिवाद केला की, हा अधिनियम त्याच्या दुकानाला किंवा आस्थापनाला लागू होणार नाही, कारण त्याने कोणत्याही अनोळखी व्यक्तीला कर्मचारी म्हणून नियुक्त केले नव्हते, तर त्याच्या दुकानातील संपूर्ण काम तो स्वत: आणि त्याच्या कुटुंबातील सदस्य करीत होते आणि अधिनियमाचे कलम ७(१) त्याच्या दुकानास लागू होईल असे मानणे हे राज्यघटनेच्या अनुच्छेद १४, १९ (१) (च) आणि (छ) अंतर्गत हमी देण्यात आलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन केल्याबद्दल, घटनाबाह्य ठरेल. ज्या दुकानांमध्ये कोणताही "कर्मचारी" नियुक्त केला नव्हता त्या दुकानांना कलम ७(१) लागू करण्याच्या घटनात्मकतेबाबत अपीलकर्त्याने उपस्थित केलेली विनंती अतिरिक्त जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी फेटाळून लावली आणि त्याला र. १००/- इतका दंड ठोठावला आणि

दंड भरण्यात कसूर केल्यास साध्या कारावासाची शिक्षा सुनावली (कारण अपीलकर्त्याला यापूर्वी एकदा दोषी ठरवण्यात आले होते). अपीलकर्त्याने या आदेशाचे पुनरीक्षण करण्यासाठी पंजाब उच्च न्यायालयात अर्ज केला, परंतु पुनरीक्षण फेटाळण्यात आले. तथापि, विद्वान न्यायमूर्तींनी योग्यतेचे प्रमाणपत्र दिले, ज्यामुळे अपीलकर्त्याला या न्यायालयात अपील दाखल करणे शक्य झाले आहे.

जरी या अधिनियमाच्या कलम ७ (१) च्या वैधतेला उच्च न्यायालयात विविध कारणांवरून आव्हान देण्यात आले असले तरी, आमच्यासमोर उपस्थित असलेल्या विद्वान वकिलांनी एका मुद्द्यावर आपला हल्ला चढवला. या तरतुदीमुळे अपीलकर्त्याला, अनुच्छेद १९ (१) (छ) द्वारे हमी देण्यात आलेल्या आपला व्यापार किंवा व्यवसाय करण्याच्या अधिकाराचे उल्लंघन होते आणि लादलेले निर्बंध अनुच्छेद १९ (६) च्या अर्थानुसार वाजवी नव्हते कारण ते सामान्य जनतेच्या हिताचे नव्हते, अशी विनंती त्यांनी केली. विद्वान वकिलांनी "दुकान सहाय्यक आणि व्यावसायिक कर्मचाऱ्यांच्या कामाचे तास मर्यादित करण्याचा कायदा आणि त्यांच्या सुट्ट्या, वेतन आणि सेवेच्या अटींबाबत विशिष्ट नियम बनविणारा अधिनियम" या अधिनियमाच्या दीर्घ शीर्षकाकडे आमचे लक्ष वेधले आणि ज्यात कोणीही "कर्मचारी" नियुक्त केले नव्हते, ते दुकान अपीलकर्त्यास बंद ठेवण्याचा आग्रह, खरोखरच कायद्याच्या कक्षेबाहेर होता आणि ज्या प्रयोजनांसाठी हा कायदा लागू करण्यात आला होता त्या हेतूंची पूर्तता करण्यासाठी तो असू शकत नव्हता. थोडक्यात, विद्वान वकिलाचा युक्तिवाद असा होता की,

आठवड्यातून एक दिवस आपले दुकान सक्तीने बंद ठेवण्याच्या तरतुदीमुळे सामान्य जनतेचे कोणतेही हित साधले जात नव्हते आणि त्यामुळे कायदेशीर व्यापार किंवा व्यवसाय करण्याच्या त्याच्या स्वातंत्र्यावर अयोग्य आणि अनावश्यक निर्बंध येत होते, जो अन्यथा, त्याला सर्वोत्तम आणि त्याला सोयीच्या आणि फायदेशीर वाटलेल्या पद्धतीने किंवा प्रकाराने कायदयास अनुसरून होता.

आमचे असे स्पष्ट मत आहे की, विद्वान वकिलांचे म्हणणे मागे घेतले पाहिजे. या अधिनियमाच्या दीर्घ शीर्षकाचा उतारा आधी देण्यात आला होता आणि ज्यावर विद्वान वकिलांनी अधिनियमाची व्याप्ती आणि कायदा करण्यामागील धोरण निश्चित करण्यासाठी मार्गदर्शक म्हणून बरीच भिस्त ठेवली होती. हे शीर्षक अधिनियमाच्या मुख्य उद्दिष्टांना सूचित करते, यात शंका नाही, परंतु साहजिकच अधिनियमाच्या स्पष्ट कार्यात्मक तरतुदींवर नियंत्रण ठेवू शकत नाही, उदाहरणार्थ कलम ७ (१) च्या अटी. तसेच कलम ७(१) च्या अटी अधिनियमाचा हेतू सुरक्षित ठेवण्यासाठी किंवा अधिनियमाच्या मूलभूत धोरणाची पूर्तता करण्यासाठी अप्रासंगिक आहेत, हा विद्वान वकिलांचा युक्तिवाद बरोबर नाही. कामगार जे समाजाचा एक आवश्यक भाग आहेत, त्यांच्या आरोग्यातून सामाजिक हित साधणे हा कायदयाचा उद्देश आहे आणि म्हणूनच, त्यांच्या कल्याणात समाजाला अत्यंत स्वारस्य आहे. या उद्देशाच्या पार्श्वभूमीवर अधिनियमातील तरतुदींची छाननी होणे गरजेचे आहे. अशा प्रकारे, तरुण व्यक्तींना, ज्या १४ वर्षांपेक्षा कमी वयाच्या व्यक्ती, असे परिभाषित करण्यात आले आहे, त्यांना

कोणत्याही दुकानात किंवा वाणिज्य आस्थापनेत नेमण्यावर निर्बंध घालणारे कलम ३ हे अर्थातच नागरिकांच्या वाढत्या पिढीचे आरोग्य सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने घालून दिले आहे. कलम ४ मध्ये 'तरुण व्यक्ती' वगळता इतर कामगारांकडून काढल्या जाणाऱ्या कामाच्या तासांबाबत निर्बंध लादण्याशी संबंधित आहे. कलम ४(१) पुढीलप्रमाणे आहे :-

"या कायद्यातील तरतुदींच्या अधीन राहून, कोणत्याही व्यक्तीकडून, दुकान किंवा व्यावसायिक आस्थापनांच्या व्यवसायात साधारण कमाल कामाच्या तासांपेक्षा जास्त, म्हणजे कोणत्याही एका आठवड्यात चोपन्न तासांपेक्षा आणि कोणत्याही एका दिवसात दहा तासांपेक्षा जास्त काम करून घेता येणार नाही."

आंतरराष्ट्रीय कामगार कराराने सुचविलेल्या निकषांच्या अनुषंगाने कामाच्या कमाल तासांच्या बाबतीत भारतात कायदा आणणे. या कलमातील पोट-खंड (४) व (५) सध्या विचाराधीन असलेल्या विषयाशी काही प्रमाणात सुसंगत आहेत :

"(४) ज्या व्यक्तीला, तो पूर्वी कोणत्याही दिवशी कारखान्यात कामावर होता अशी दुकान किंवा व्यावसायिक आस्थापनेच्या मालकाची माहिती असेल, त्याला त्या दिवशी दुकानाच्या किंवा व्यावसायिक आस्थापनेच्या व्यवसायात इच्छेपेक्षा जास्त काळ, तसेच तो कारखान्यात पूर्वी ज्या कालावधीत त्या दिवशी कामावर होता, त्याला त्या ठिकाणी या अधिनियमानुसार परवानगी दिलेल्या तासांची संख्या पूर्ण झाल्यानंतर काम करता येणार नाही.

(५) कोणतीही व्यक्ती दुकान किंवा वाणिज्यिक आस्थापनेच्या किंवा दोन किंवा अधिक दुकाने किंवा आस्थापनेच्या व्यवसायात आणि कारखान्यात, ज्या कालावधीत त्याला या अधिनियमांतर्गत कायदेशीररित्या नियुक्त केले जाऊ शकते त्यापेक्षा जास्त कालावधीकरिता काम करू शकत नाही."

हे दिसून येते की, पोट-खंड (४) अन्वये, ज्या व्यक्तीने दुसऱ्या एखाद्या आस्थापनेमध्ये अनुज्ञेय कमाल तासांकरिता आधीच काम केले असेल अशा व्यक्तींना कामावर ठेवण्यास नियोक्त्यास प्रतिबंध आहे , पोट-खंड (५) अधिक उत्पन्न मिळविण्याच्या प्रयत्नात जास्त काम करून कामगाराचे आरोग्य बिघडविण्यापासून स्वत: कामगारावर बंदी घालते. यावरून हे स्पष्ट होईल की, हा अधिनियम कामगाराच्या कल्याणाशी संबंधित आहे आणि योग्यरीत्या संबंधित आहे आणि केवळ मालकाच्या कृतीतून नव्हे तर त्याच्या स्वतःच्या कृतीतून त्याला होणारी इजा टाळण्याचा प्रयत्न करतो. दुसऱ्या शब्दांत, कामगाराला जास्त तास काम करून जास्त वेतन मिळविण्याचा प्रयत्न करण्यापासून रोखले जाते, जे त्याच्यासाठी चांगले आहे. एखाद्याच्या बाबतीत अशी अट आवश्यक किंवा योग्य असेल तर, तीच किंवा तत्सम तत्वे, आपल्या स्वतःच्या व्यवसायात काम करणाऱ्या नियोक्त्याला लागू करण्यात काहीही अवाजवी असल्याचे वाटत नाही. उच्च न्यायालयाच्या विद्वान न्यायमूर्तींचा प्रकरणाच्या या भागावरील त्यांचा निर्णय या कारणावर आधारित होता की, आक्षेपित कलमाची रचना ही दुकान किंवा आस्थापनेच्या मालकाच्या स्वतःच्या हितासाठी करण्यात आली आहे आणि त्याचे

आरोग्य आणि कल्याण हे केवळ त्याच्याच नव्हे तर सर्वसामान्य जनतेच्या हिताचा विषय आहे, या कारणास्तव संबंधित कलमाच्या अटींचे समर्थन होऊ शकेल. हा कायदा वस्तुतः प्रत्यक्षात व्यवसाय कशा प्रकारे चालवला जावा यावर सामाजिक नियंत्रणाचा वापर करण्यासाठी आहे - केवळ त्यात काम करणाऱ्यांच्याच नव्हे तर त्यात गुंतलेल्या सर्वांच्या आरोग्य आणि कल्याणाच्या हितासाठी त्याचे नियमन केले जाते. हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने घातलेले निर्बंध, आमच्या मते, स्पष्टपणे अनुच्छेद १९ (६) व्यतिरिक्त आहेत.

याव्यतिरिक्त, आक्षेपित तरतुदीची घटनात्मकता दुसऱ्या आधारावरदेखील कायम ठेवली जाऊ शकते, ती म्हणजे, विशेषत: कार्यरत कामगारांच्या संरक्षणासाठी तयार केलेल्या तरतुदींना बगल देऊन टाळण्याच्या दृष्टीने. हे निदर्शनास आणून दिले जाऊ शकते की, जर वैध तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी निश्चित करण्यासाठी आवश्यक असेल, तर स्वतःच निरपराध असलेली कृत्ये निषिद्ध असू शकतात आणि त्या संदर्भातील निर्बंध वाजवी असतील. प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी वाजवी मर्यादेचा समावेश केल्यास, वैधानिक सक्षमतेच्या अर्थानुसार अन्यथा वैध असलेल्या अधिनियमावर, अवाजवी असल्याच्या कारणास्तव तो घटनाबाह्य स्वरूपाचा असल्याचा शिक्का बसणार नाही. त्यामुळे प्रशासकीय सोयी-सुविधा मिळाव्यात आणि तरतुदी न टाळता, त्यांची योग्य अंमलबजावणी व्हावी, यासाठी या तरतुदी समर्थनीय असू

शकतात. मनोहर लाल वि. राज्य[1] या प्रकरणात या न्यायालयाने नमूद केल्याप्रमाणे, (जेव्हा अपीलकर्त्याने याच समान तरतुदीच्या वैधतेला, परंतु इतर कारणांवरून आव्हान दिले होते ) :

"चुकवेगिरीची शक्यता कमीत कमी करण्यासाठी, जे अन्यथा बाधित झाले नसते, त्यांच्या स्वातंत्र्यावर अतिक्रमण करणे विधिमंडळाला आवश्यक वाटले असावे ............ एक किंवा दोन माणसांना रोजगार देणाऱ्या दुकानदाराला बंद ठेवण्याची आवश्यकता आणि त्याच्या प्रतिस्पर्ध्याला, जो कदाचित त्याच्या कुटुंबातील डझनभर सदस्यांना कामावर ठेवतो, त्याला सुरू ठेवण्याची परवानगी देण्याची आवश्यकता, यामुळे आधीच्या व्यक्तीचे स्पष्टपणे मोठ्या प्रमाणात व्यावसायिक नुकसान होते. अशा तफावतीस परवानगी देण्यामुळे खूप असंतोषाची भीती आहे आणि अखेरीस, त्यामुळे नियोक्ता आणि नोकरदार यांच्या नातेसंबंधांवर परिणाम होऊ शकतो."

त्यामुळे या अधिनियमाच्या कलम ७ (१) च्या घटनात्मकतेवर झालेला हल्ला मागे घेण्यात आम्हाला कोणताही संकोच वाटत नाही. अपील अयशस्वी होते आणि फेटाळण्यात येत आहे.

अपील फेटाळले.

x-x-x-x

1 [१९५१] एस. सी. आर. ६७१, ६७५

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x